महाराष्ट्र टाइम्स, कोल्हापूर ■ शनिवार, २९ ऑगस्ट २०१५

# विद्यापीठाची हायटेक लायब्ररी खुली

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या खर्डेकर ग्रंथालयतील नूतन अभ्यासिकेत सातशे विद्यार्थ्यांची व्यवस्था होणार आहे. लॅपटॉप वापराच्या सुविधेसह वाय फाय कॅम्ससह जगभरातील पुस्तकांचा संदर्भ उपलब्ध होणार आहे. वाचन संस्कृती आणि चळवळीला अधिक बळ मिळणार आहे. स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांना मात्र या अभ्यासिकेत प्रवेश मिळणार नाही.

बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयाजवळील नूतन अभ्यासिका विद्यार्थ्यांच्यासाठी खुली करण्यात आली. अभ्यासिकेचा फायदा विविध अभ्यासक्रमाच्या सुमारे सातशे विद्यार्थ्यांना होणार आहे. खर्डेकर ग्रंथालयाचा एकूण दोन हजार विद्यार्थी लाभार्थी आहेत. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयात पुरेशी व्यवस्था होत नसल्याची विद्यार्थ्यांची तक्रार होती. त्या पार्श्वभूमीवर नूतन अभ्यासिकेची व्यवस्था केली आहे. अपंग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र रॅम्पची सोय केली आहे. सध्या या अभ्यासिकेची प्रायोगिक तत्वावर सकाळी दहा ते सहा अशी वेळ ठेवली आहे. येत्या काही दिवसांत ही वेळ वाढविली जाणार असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. अभ्यासिकेत प्रवेशिकेसाठी विद्यार्थ्यांना स्मार्ट कार्ड दिले आहे. मेन रिंडीग आणि प्लेन इमारतीत पहाटे सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना सोय उपलब्ध आहे. टेरेस रिडिंग सकाळी सात ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत खुले आहे.



अत्याधुनिक साधनांचा उपयोग करुन विद्यार्थी जगभरातील कोणत्याही पुस्तकाचे वाचन इ लायब्ररीतून करु शकतात. ही लायब्ररी वरदानच ठरत आहे.

- डी. बी. सुतार, उपग्रंथपाल

या लायब्ररीत अत्याधुनिक साधनांचा उपयोग करणे शक्य होणार आहे. नव्या लायब्ररीत पुरेशी व प्रशस्त जागा असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

राजाराम पाटील, विद्यार्थी

नवीन अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा लाभ मिळत नव्हता. अभ्यासिकेमुळे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणाऱ्यांची सोय झाली आहे.

- शंकर पवार, विद्यार्थी

**बैठक व्यवस्था आणि प्रवेश क्षमता**

- रेफ्ररन्स : ८० विद्यार्थी
- प्लेन : २०० विद्यार्थी
- एआरसी ५० विद्यार्थी
- पिरॅऑडिकल ५० विद्यार्थी
- टेरेस रिडिंग १००